तात्काळ/कालमर्यादा/महत्त्वाचे

क्र.पोमसं/३१/३९-४/मोवाअ-संगणक अग्रीम (२०२३-२४)/९७/२०२३,                मुंबई, दि.०१/०१/२०२४.

विषय - लेखा अनुदान २०२३-२४

मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष- " ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०४, संगणक अग्रिमाबाबत.

********

## आदेश

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.बीयुडी - ०४२३/प्र.क्र.१२२/आस्था-१, दि.०८/११/२०२३ अन्वये सन २०२३-२४ या वित्तिय वर्षासाठी शासनाने मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष-" ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०४, संगणक अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) योजने अतंर्गत २०% निधी म्हणजेच रु.२०,००,०००/- (अक्षरी वीस लाख फक्त) एवढा निधी बी.डी.एस. प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच मागिल शिल्लक निधी रु.८,००,०००/- (अक्षरी आठ लाख फक्त) असा एकूण रु.२८,००,०००/- (अक्षरी अठ्ठावीस लाख फक्त) इतका निधी वाटपा करीता बी.डी.एस. प्रणालीवर उपलब्ध आहे. या कार्यालयाच्या अधिपत्याखालील घटक कार्यालयातील संबंधित विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांचे आस्थापनेवरील संबंधित ३४ अधिकारी / कर्मचाऱ्यांना संगणक अग्रिम वाटप करण्याकरिता एकूण रु.६,८०,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख ऐंशी हजार फक्त) इतका निधी बी.डी.एस. प्रणालीवर सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रमाणे उपलब्ध निधीपैकी रु.६,८०,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख ऐंशी हजार फक्त) निधीचे सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांना, शासन निर्णय वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/ २०११/ विनियम, दि.०३/०२/२०१२ अन्वये अग्रीमाची रक्कम जास्तीत जास्त रु.२०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) किंवा संगणक/लॅपटॉप/टॅबलेट संगणकाची प्रत्यक्ष किंमत, यापैकी जी कमी असेल त्या रकमेचे संगणक अग्रिम वाटप करावे.

३. विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, दिनांक १७/४/२०१५ अन्वये मुंबई वित्तिय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या, तसेच वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १३ नियम १३६,१३७ व १३९ अन्वये संगणक अग्रिम मंजूरीचे त्यांचे स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत. त्यामध्ये शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम-१०११/ प्र.क्र. ५० / २०११/ विनियम, दि. ०३/०२/२०१२ मधील विहित अटी / शर्तींचा समावेश करावा.

४. विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना सूचित करण्यात येते की, शासन वित्त विभाग, क्र. अग्रिम-१०११/प्र.क्र.५०/ २०११/विनियम, दि. ०३/०२/२०१२ **अन्वये विहित केलेल्या अटी व शर्तींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर शासन निर्णयातील अट क्र. ९ मधील विहित तरतुदीनुसार संगणक खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संगणक अग्रिम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत संबंधीत कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपूर्ण रक्कम १७.७५% व्याजदराने एक रकमी वसूल करण्यात येईल, असे मंजूरी आदेशात नमुद करावे. अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४(बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६.०९.१९९७ मध्ये नमूद तसेच, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.**

५. सदर निधीचा विनियोग पुर्णत:न केल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात. तरी निर्देश देण्यात येत आहेत की, विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचे संगणक अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत. तसेच, आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके कोणत्याही परिस्थितीत दि.३१/०३/२०२४ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्याला अग्रिम रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी

सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन व या प्रकरणी वैयक्तीकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखा विषयक कामकाज हाताळणारे लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी /लिपिक वर्गीय अधिकारी /कर्मचारी यांनी स्वत: लक्ष देऊन त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. जेणेकरुन शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा विनियोग पूर्णत: होईल. तसेच शासन वित्त विभाग, क्र. अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/ २०११ /विनियम, दि. ०३/०२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या अटींचे पालन करुन त्यानुसार संबंधितांना अग्रिमाचे वाटप करण्याची दक्षता घ्यावी. संबंधीतांना अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्याची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक त्यांचे सेवापुस्तकात/ सेवापटात नोंद करावा आणि या कार्यालयास /शासनास व महालेखापाल-१,मुंबई /महालेखापाल-२, नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना दि.३१/०४/२०२४ पुर्वी न चुकता तसा अहवाल सादर करावा.

६. असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण-१४ नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. व त्यानुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळ्याची प्रमाणित माहिती दि.३१/०५/२०२४ पूर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखाची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

७. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, खर्चमेळ्याची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारीही क्षेत्रीय विभागीय कार्यालय प्रमुखांची राहील व त्याप्रमाणे माहिती न पाठविणाऱ्या कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल यांची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/कार्यालय प्रमुखाची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

८. सदरचा खर्च सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०-शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०४- संगणक अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) अन्वये खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२३-२४ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

(निसार तांबोळी)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक कार्यालय, म. राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, औरंगाबाद
पोलीस अधीक्षक, रत्नागिरी /बुलडाणा/ भंडारा.

प्रत सविनय सादर -

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,
मादामकामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२
(लक्षवेध:- कक्ष अधिकारी, आस्था - १)

महालेखापाल - १ मुंबई / महालेखाकार - २, नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

| पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई "७६१०- शासकीय कर्मचारी इ. ना कर्जे " वित्तीय वर्ष २०२३-२४ मागणी क्र.बी-११ गौणशिर्ष २०४- वैयक्तिक संगणक अग्रिम | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | घटक कार्यालयाचे नाव | विभाग प्रमुख | अर्जांची संख्या | मागणी केलेले अनुदान |
| १. | पोलीस आयुक्त, औरंगाबाद | पोलीस आयुक्त, औरंगाबाद | २० | ४००००० |
| २. | पोलीस अधीक्षक, रत्नागिरी | पोलीस अधीक्षक, रत्नागिरी | ८ | १६०००० |
| ३. | पोलीस अधीक्षक, बुलडाणा | पोलीस अधीक्षक, बुलडाणा | ३ | ६०००० |
| ४. | पोलीस अधीक्षक, भंडारा | पोलीस अधीक्षक, भंडारा | ३ | ६०००० |
| | | एकूण | ३४ | ६,८०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| घटक कार्यालयांची एकुण मागणी (अक्षरी रु. सहा लाख ऐंशी हजार फक्त) | ६,८०,०००/- | |
| मागिल शिल्लक अनुदान | | ८,००,०००/- |
| शासनाकडून प्राप्त अनुदान (अक्षरी रु. वीस लाख फक्त) | | २०,००,०००/- |
| एकूण शिल्लक अनुदान (अक्षरी रु. अठ्ठावीस लाख फक्त) | | २८,००,०००/- |
| घटक कार्यालयास वाटप अनुदान (अक्षरी रु. सहा लाख ऐंशी हजार फक्त) | | ६,८०,०००/- |
| पोमसं कार्यालयातील लिपीक यांना वाटप अनुदान (अक्षरी रु. चाळीस हजार फक्त) | | ४०,०००/- |
| एकूण वाटप अनुदान (अक्षरी रु. सात लाख वीस हजार फक्त) | | ७,२०,०००/- |
| एकूण शिल्लक अनुदान (सदर आदेश निर्गमित झाल्यानंतर) | | २०,८०,०००/- |